MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

■ वर्ष : १३ अंक : १ पाने : १२ ■ डिसेंबर २०१८ ते जानेवारी २०१९ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

*प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,*

कोणत्याही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी व चांगल्या प्रगतीसाठी ऊर्जा हा अतिशय महत्त्वाचा घटक असतो. देशाची एकूण प्रगती ही ऊर्जा क्षेत्रातील प्रगतीशी संलग्नित असते. महाराष्ट्र राज्य ऊर्जा क्षेत्रामध्ये सातत्याने प्रगतीच्या दिशेने अग्रभागी राहिले आहे. केंद्र सरकारच्या "हर घर बिजली" घोषणेला पूरक असे प्रयत्न करण्यात महापारेषण व इतर वीज क्षेत्रांशी निगडित कंपन्या सतत प्रयत्नशील आहेत.

भारतीय ऊर्जा क्षेत्र हे मोठया प्रमाणात बदलत आहे. या बदलास पूरक असा शासकीय खर्च देखील राज्य शासन व केंद्र शासन विविध योजनांद्वारे वाढवत आहे. विजेच्या वाढत्या मागणी सोबतच

- *अधिकाऱ्यांनी एकमेकांशी समन्वय ठेवावा*
- *कामांची गती वाढविण्याची आवश्यकता*
- *कामांचा पाठपुरावा करण्याची गरज*
- *सांघिक कामगिरीमुळे अडचणींवर मात*

नियमित व अखंडित वीज पुरवणे हे आव्हान नेहमीच वाढत जाणार आहे. केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रत्येक घरामध्ये वीज प्रकल्पाचे ध्येय गाठणे हे वीज क्षेत्रातील प्रत्येक भागधारकाचे प्रथम ध्येय झाले आहे. यामध्ये पारेषण प्रणालीचा वाटा हा महत्त्वाचा व आव्हानात्मक आहे.

केंद्र शासनाच्या 'सौभाग्य' योजनेद्वारे ४ कोटी घरांमध्ये वीज पोहोचविण्यासाठी मोठया प्रमाणात गुंतवणुक केली आहे. यास पूरक आंतर-क्षेत्रीय पारेषण प्रणालीच्या सक्षमीकरणाकरिता मोठे काम होणे क्रमप्राप्त झाले आहे. तसेच आंतर–क्षेत्रीय वीज निर्गमी करण्याकरिता प्रणालीच्या यंत्रणीकरणाकरिता मोठे काम होणे क्रमप्राप्त झाले. तसेच आंतर-क्षेत्रीय वीज निर्गमीकरणाकरिता प्रणालीच्या क्षमता वाढीचे प्रकल्प देखील मार्गी लावणे क्रमप्राप्त आहे. महापारेषण यंत्रणेचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्याकरिता महावितरण व महानिर्मिती, तसेच इतर वीज निर्मिती संघटनांशी समन्वय साधून आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे ठरते. त्याकरिता आवश्यक पुढाकार घेणे हे महापारेषण मधील प्रत्येक विभागाचे व कर्मचाऱ्यांचे प्रथम कर्तव्य असले पाहिजे. त्यामध्ये कोणतीही उणीव आपण ठेवणार नाहीत, याचा मला विश्वास आहे.

कंपनीच्या कामाचा आढावा घेताना मी पाहतो की, बऱ्याच ठिकाणी कामाची गती वाढविण्याची आवश्यकता आहे. काही ठिकाणी दिलेल्या निर्देशांचे पालन अधिकारी करताना दिसत नाहीत. काही ठिकाणी कामे रेंगाळलेली दिसून येतात. त्याबाबतच्या अडचणी वरिष्ठांना वेळेत निदर्शनास न आणल्यामुळे जेव्हा सांघिक कार्यालयाकडून आढावा घेण्यात येतो. त्यावेळी त्या अडचणी उपस्थित केल्या जातात. त्यामुळे एकंदरीत आढावा व नियंत्रणाबाबत क्षेत्रीय पातळीवर दक्ष राहायला हवे. माझी धारणा आहे की, कोणत्याही अडचणींवर सांघिक प्रयत्नांनी मात करता येऊ शकते.

आपण जी सेवा देतो किंवा जी कार्यप्रणाली वापरतो, ती अनेकदा आपल्या वर्षानुवर्षे अंगवळणी पडलेली असते. पण त्या कार्यप्रणालीत सतत सुधारणा करून ती सक्षम करण्याची जबाबदारी प्रत्येक अभियंता व अधिकाऱ्यांची आहे. त्यादृष्टीने आपण किती विचार करतो, याचा प्रत्येकाने आढावा घ्यावा आणि कार्यप्रणालीत कोणत्या सुधारणा करता येतील, याविषयी पुढाकार घ्यावा. अशा पुढाकाराचे कंपनी स्वागत करेल, ही खात्री आपण सर्वांनी बाळगावी, अशी माझी विनंती आहे. प्रत्येक नियंत्रण अधिकारी आपल्या स्तरावर आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य नियंत्रण ठेवतील, अशी मला आशा आहे. कामाचा तत्पर आढावा व नियंत्रण यशाचे गमक असते.

कंपनीचे यश हे त्यामधील कर्मचारी आपापसात कशा पध्दतीने संवाद साधतात व एकत्रित कार्य हाताळतात यावर अवलंबून असते. सांघिक कार्य हे संघटनेच्या दैनंदिन कामकाजाचा महत्त्वाचा भाग आहे. त्याचा फायदा हा काम करण्यासाठी आवश्यक ती प्रेरणा निर्माण करण्यात होतो. त्यामुळे कामाप्रती निष्ठा व आदर तयार होऊन कार्य उत्तमरित्या पूर्ण करता येते. सांघिक कामगिरीमुळे कठीण कामही पूर्णत्वास नेणे सहज शक्य होते. अशाच सांघिक कार्याचा अंतर्भाव करण्यात आपण मागे पडता कामा नये. नवनवीन गोष्टी शिकण्याची आस व त्यासाठी



**पराग जैन नानोटिया** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याकरिता केलेले प्रयत्न हे नेहमीच कंपनीच्या यशस्वी वाटचालीकरिता फायद्याचे ठरते. मानव संसाधन विभाग कर्मचाऱ्यांना अशा नवनवीन गोष्टी शिकण्याची संधी उपलब्ध करुन देत असते. कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा चांगल्या पध्दतीने फायदा घेतला पाहिजे व प्रत्येकाने कंपनीच्या वाढीमध्ये आपला हातभार लावला पाहिजे.

नेतृत्वगुणांचा वापर हा आपल्या सह कर्मचा-यांना प्रेरित करण्यासाठी करुन त्यांना सक्रियतेने संघटन बांधण्याकरिता मार्गदर्शन केले पाहिजे. सर्व विभागीय प्रमुख व प्रत्येक छोटया-छोटया विभागाचे प्रमुख आपल्या नेतृत्वाने एक चांगला मार्ग आपल्या सह कर्मचाऱ्यांना दाखवतील, असा मला विश्वास आहे.

सुयोग्य व्यवस्थापन, चांगले नेतृत्व, कामाची सुयोग्य विभागणी, नियमित देखरेख, कामाप्रती निष्ठा अशा सर्वगुणांचा एकत्रित अंतर्भाव करुन प्रत्येक जण कंपनीच्या यशस्वी वाटचालीत आपले योगदान देतील, याची मला खात्री आहे.

**शुभेच्छांसह..!**

**– पराग जैन नानोटिया**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




**मुंबई :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या कामाच्या आढावा बैठकीत बोलताना राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. अरविंद सिंह, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, मराविमं सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक व महापारेषणचे वरिष्ठ अधिकारी.

## ■ ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश ■

# ग्रिड कनेक्टिविटीच्या मंजुरी ऑनलाईन पद्धतीने कराव्यात

■ *टीम महापारेषण, मुंबई*

'महापारेषण'ने ग्रिड कनेक्टिविटीच्या सर्व मंजुरी ऑनलाईन पद्धतीने कराव्यात, असे निर्देश राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. तसेच मोजमाप पुस्तिका व देयके प्रक्रियाही ऑनलाईन राबवावी, असेही ऊर्जामंत्र्यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) मुंबईत घेतलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. अरविंद सिंह, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, मराविमं सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक, 'मेडा' चे महासंचालक श्री. के. बी. उमाप, संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) गणपत मुंडे, संचालक (वित्त) विनायक साठे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी) सुगत गमरे, मुख्य अभियंता एस. एस. जेवळीकर, आर.एल. गायकवाड, अनिल कोलप, श्रीकांत राजूरकर, श्रीराम भोपळे, एन. एस. तेलतुंबडे, अद्वैत देव, मोतीसिंह चौहान, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) संजय कुमार आदी उपस्थित होते.

सुरुवातीला राज्यातील सर्व प्रलंबित असलेल्या उपकेंद्रांचा जिल्हानिहाय आढावा घेऊन मार्च २०१९ पर्यंत कामे पूर्ण करण्याबाबतचे निर्देश ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. २०१९-२०२० मध्ये 'आरएफडी'च्या अंतर्गत येणाऱ्या २२० के.व्ही. आणि त्यापेक्षा जास्त क्षमतेचे उपकेंद्रे व पारेषण वाहिन्यांचा जिल्हानिहाय आढावा घेतला. पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अकोला, नांदेड, अमरावती येथील रिंग मेन सिस्टीम प्रकल्पांचा आढावा घेतला. यावेळी समृध्दी महामार्गाअंतर्गत येणारी उपकेंद्रे व पारेषण वाहिन्यांचे सादरीकरण करण्यात आले. वाढत्या अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांची क्षमता लक्षात घेऊन ग्रीड स्टेबिलिटी रिपोर्टचे सादरीकरण करण्यात आले.

संचलन व सुव्यवस्था विभागाच्या मागील दहा वर्षात परिमंडलनिहाय झालेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला. मोनोपोल पॉलिसी व अंडरग्राऊंड जीआयएस प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याकरिता योजना, महापारेषण उपकेंद्रातील ११ के.व्ही. २२ के. व्ही. व ३३ के. व्ही. पर्यंतच्या वीज वाहिन्यांची दुष्यमानता भार प्रेषण केंद्र कळवा येथे जोडण्यास होत असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगव्दारे सर्व मुख्य अभियंता व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला. कॅलिफोर्निया, बरकले येथे प्रशिक्षणासाठी गेलेल्या मुख्य अभियंता सर्वश्री एस. एस. जेवळीकर, आर. एल. गायकवाड, अनिल कोलप व अधीक्षक अभियंता श्री. महेंद्र वाळके यांनी आपले अनुभव विषद केले.



## *महापारेषणची उद्दिष्टे*

संचलन, सुव्यवस्था व प्रकल्प उभारणीशी संबंधित विविध कामे करताना सुरक्षिततेची खातरजमा करणे.



■ क्षेत्रीय परीक्षण प्रयोगशाळेचे भूमिपूजन ■

# मार्चअखेर संपूर्ण देश होणार भारनियमनमुक्त : आर.के.सिंग



**नाशिक :** केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थान नाशिक युनिटचे भूमिपूजन केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. आर. के. सिंग यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्री. हेमंत गोडसे, आमदार श्रीमती देवयानी फरांदे यांच्यासह अन्य मान्यवर.

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण, नाशिक*

``गेल्या साडेचार वर्षांत देशाच्या वीजनिर्मिती क्षमतेत तब्बल एक लाख मेगावॅटने वाढ झाली आहे. त्यामुळे सर्व राज्यांतील शहरांमधील भारनियमन संपुष्टात आले आहे. आता मार्च २०१९ पर्यंत संपूर्ण देश भारनियमन मुक्त होईल``, असे प्रतिपादन केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. आर. के. सिंग यांनी केले.

नाशिकजवळच्या शिलापूर परिसरात केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थेच्या क्षेत्रीय परीक्षण प्रयोगशाळेच्या भूमिपूजन समारंभात श्री. आर. के. सिंग बोलत होते. याप्रसंगी राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्री. हेमंत गोडसे, जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीमती शीतल सांगळे, आमदार श्रीमती देवयानी फरांदे, आमदार श्री. योगेश घोलप, आमदार श्री. राजाभाऊ वाजे, माजी मंत्री श्री. बबनराव घोलप, माजी खासदार श्री. समीर भुजबळ, माजी आमदार श्री. जयवंत जाधव, अनुसंधान संस्थेचे महासंचालक श्री. व्ही. एस. नंदकुमार, ऊर्जा मंत्रालयाचे आर्थिक सल्लागार श्री. राज पाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. सिंग म्हणाले, ``ऊर्जा विभाग निरंतर विजेचे स्वप्न साकारत असून देशभरातील सर्वच ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्यात येणार आहे. यात खंड पाडणाऱ्या वीज पुरवठादारांना खंडित कालावधीसाठी दंड आकारून त्याचा लाभ वीज ग्राहकांना देण्याचा धोरणात्मक निर्णय मार्चनंतर लागू करण्यात येईल. देशभरातील १ लाख ८० हजार किलोमीटरची वाहिनी एका ग्रीडला ओढून 'एक राष्ट्र, एक ग्रीड' ही संकल्पनाही प्रत्यक्षात आणली आहे. एक हजार दिवसांच्या आत देशातील प्रत्येक गावात वीज पोहोचविण्यात आली. तर वीजजोडणीपासून वंचित प्रत्येक घरात वीज पोहोचविण्याचे उद्दिष्टही जानेवारीअखेर पूर्ण होईल. सौभाग्य योजनेतून जोडणी देण्यासाठी राज्याला दोन टप्प्यात ८०० कोटी रुपयांचा निधी दिला. महाराष्ट्राचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मागणीनुसार वाहिनी विलगीकरणासाठी २ हजार रुपये महाराष्ट्राला देण्याचे आश्वासन श्री. सिंग यांनी दिले. देशात ऊर्जा क्षेत्रात गेल्या साडेचार वर्षात झालेल्या कामांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर कौतुक होत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## पाच वर्षांत सर्वच शेतकऱ्यांना सौरऊर्जेतून दिवसा वीज : ऊर्जामंत्री

*गेल्या चार वर्षात पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाने विजेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांमुळे महाराष्ट्र आज देशात अव्वल आहे. स्मार्ट मीटर, मोबाईल ॲप, प्रीपेड मीटर तसेच तंत्रज्ञानाच्या वापरातून वीज क्षेत्राला आधुनिकीकरणाकडे नेण्याचा प्रयत्न झाला आहे. अपारंपरिक उर्जेला प्रोत्साहन देताना येत्या पाच वर्षात राज्यातील सर्वच शेतकऱ्यांना सौरऊर्जेतून दिवसा वीज देण्यात येणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी व मुख्यमंत्री सौर कृषिपंप या योजना राबविण्यात येत आहेत. राज्यातील ग्रामीण भागात असलेले ७०० फिडरचे विलगीकरण केल्यानंतर ग्रामीण कृषी वाहिनीवर असलेल्या वीज ग्राहकांना अखंडित वीज देता येणे शक्य आहे. त्यासाठी २ हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर एका वर्षात वाहिनी विलगीकरणाचे काम पूर्ण करण्यात येणार असल्याचे राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.*

■ ऊर्जा विभागाचा पुढाकार ■

# नाशिकमध्ये विद्युत सप्ताह साजरा

■ *टीम महापारेषण, नाशिक*

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग व ऊर्जा विभागाच्या वतीने ११ ते १७ जानेवारी दरम्यान विद्युत सप्ताह साजरा करण्यात आला.

यावेळी विद्युत सुरक्षितता या विषयावर विद्युत निरीक्षक श्री. हेमंत गांगुर्डे यांचे व्याख्यान घेण्यात आले.याप्रसंगी परिमंडळाचे मुख्य अभियंता सर्वश्री जयंत वीके अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास अधीक्षक अभियंता प्रवीण भालेराव, किशोर जाधव, शरद लोखंडे, योगेश चव्हाण, दीपक पाटील, प्रमोद गोडसे, अरुण जांगडे, श्रीकृष्ण नवलाखे, भूषण पाटील, विनोद ढोरे व अन्य अधिकारी उपस्थित होते.




**नाशिक :** विद्युत सुरक्षितता सप्ताहात विद्युत सुरक्षितता या विषयावर बोलताना विद्युत निरीक्षक श्री. हेमंत गांगुर्डे, शेजारी मुख्य अभियंता सर्वश्री जयंत वीके, प्रवीण भालेराव, किशोर जाधव.

■ लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची घेतली शपथ ■

# 'महापारेषण'मध्ये राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

## वंचित ना राहो कोणी मतदार



**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेताना अधिकारी व कर्मचारी.

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या महाराष्ट्रातील विविध कार्यालये, उपकेंद्रे व भांडारे यामध्ये राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. २५ जानेवारी २०१९ रोजी हा कार्यक्रम घेण्यात आला.

यानिमित्ताने सांघिक कार्यालयामध्ये यावेळी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्यात आली. याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, मुख्य अभियंता (कंत्राटे व अनुश्रावके) श्री. आर.एल. गायकवाड, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. अनिल कालेकर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे तांत्रिक सल्लागार सुनील सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता श्री. महेंद्र वाळके यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### *महापारेषणची उद्दिष्टे*

उपकेंद्राचा आराखडा, सुव्यवस्था आणि सुरक्षा,
दुरुस्ती व संवर्धन करणे



@Innovations

# नव उद्यमींच्या 'महाराष्ट्र स्टार्टअप वीक'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ *टीम महापारेषण, मुंबई*

राज्यातील उद्योग क्षेत्राला चालना मिळावी, यासाठी महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीच्या वतीने 'महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताह २०१९' चे आयोजन करण्यात आले. स्टार्टअप सप्ताहामुळे नवउद्यमींना त्यांच्या अभिनव प्रकल्पाचे सादरीकरण करण्याची संधी मिळाली आहे. यामुळे थेट शासनासोबत काम करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

दरम्यान, उद्योगमंत्री श्री. सुभाष देसाई यांनी क्लीन एनर्जी (स्वच्छ ऊर्जा) या सादरीकरणाचे मूल्यमापन केले. यावेळी शेल कंपनीचे गुंतवणूक प्रमुख श्री. सिद्धार्थ मेहता, नेरीचे डॉ. राजेश बिनिवाले, 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, एमपीसीचे संचालक श्री. एस. के. श्रीवास्तव, महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीचे सहआयुक्त श्री. मिथुन जॉन, श्री. अमित कोठावदे आदी उपस्थित होते.



**मुंबई :** महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीच्या वतीने 'महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताह २०१९' चे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी उद्योगमंत्री श्री. सुभाष देसाई, श्री. सिद्धार्थ मेहता, डॉ. राजेश बिनिवाले यांच्यासह अन्य अधिकारी.

दिनांक २८ जानेवारीपासून या उपक्रमास सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र स्टेट इनोव्हेटीव्ह सोसायटीकडून यासाठी देशभरातील नवउद्यमींकडून अर्ज मागवण्यात आले होते. त्याला दीड हजार नव उद्यमींनी प्रतिसाद दिला. शिक्षण आणि कौशल्य,आरोग्य सेवा, शेती, प्रदूषण विरहित ऊर्जा, जल व कचरा व्यवस्थापन, प्रशासन,सर्वसमावेशक आर्थिक विकास आदी क्षेत्रातील स्टार्टअप्सनी सादरीकरणासाठी अर्ज केले आहेत. यापैकी शंभर उत्कृष्ट नव उद्यमींची सादरीकरणासाठी निवड करण्यात आली आहे. या प्रक्रियेकरिता महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी यांची सोशल आल्फा (social Alpha), इंटेलकॅप( Intellecap), ओमिडियार नेटवर्क (Omidyar Network), भारत इनोव्हेशन फंड (Bharat Innovation Fund), एक्युमेन(Acumen), युनायटेड इंडिया( Unltd India) अशा नावाजलेल्या संस्थांसोबत भागीदारी केलेली आहे.

उत्कृष्ट ठरलेल्या १०० स्टार्टअप्सना त्यांच्या अभिनव संकल्पना उद्योग जगतातील तज्ज्ञ, गुंतवणूकदार, शासकीय अधिकारी यांच्यासमोर मांडण्याची संधी देण्यात आली. उद्योगमंत्री श्री. सुभाष देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत क्लीन एनर्जी (स्वच्छ ऊर्जा) या विषयावर नवउद्यमींनी सादरीकरण केले. हवेतील प्रदूषण रोखण्यासाठी दिल्लीतील नव उद्यमींनी फिल्टरचा शोध लावला आहे. त्यामुळे हवेतील प्रदूषक कमी होण्यास मदत होणार आहे. सौर ऊर्जा पॅनलचा वापर करून उद्योग चालवण्याबाबत यावेळी सादरीकरण करण्यात आले. नव उद्यमींनी सादर केलेल्या प्रकल्पांपैकी २४ विजेत्यांना प्रत्येकी १५ लाख रुपयांपर्यंतची शासकीय कामे देण्यात येणार आहेत.

■ ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रतिक्रिया ■

# सर्वसमावेशक अर्थसंकल्प : ऊर्जामंत्री

■ *टीम महापारेषण, मुंबई*

केंद्रीय अर्थमंत्री श्री. पीयूष गोयल यांनी सादर केलेले केंद्रीय बजेट ऐतिहासिक असून सर्वसमावेशक आहे. या अर्थसंकल्पात शेतकरी हा केंद्रबिंदू असून महिला, कामगार वर्गासह कष्टकरी जनतेचा पूर्ण विचार केला गेला आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प येणाऱ्या काळात देशाचं भवितव्य प्रकाशमान करणार असल्याची प्रतिक्रिया राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली आहे.



केंद्रीय अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार रूपये वार्षिक मानधन योजना जाहीर केली असून त्याचा फायदा २ हेक्टरपर्यंत शेती असणाऱ्या अल्पभूधारक शेतकऱ्याला होणार आहे. शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे. हा अर्थसंकल्प शेतकरीधार्जीणे असल्याचे मत श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. गर्भवती महिलांकरिता २६ आठवड्यांची भरपगारी रजा देण्यात येणार आहे. त्यामुळे महिलांना आपल्या पाल्याचे चांगल्या पध्दतीने संगोपन करता येईल. ५ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा केल्याने मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांसह प्रत्येक वर्गाला अर्थसंकल्पात न्याय देण्याचा प्रयत्न या बजेटमधून करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पनेचे आपण स्वागत करीत आहोत, असेही श्री. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.



## *महापारेषणची उद्दिष्टे*

परस्परांच्या हितांची जपणूक व्यवस्थापनात रुजविणे



सांस्कृतिक

■ नाटकाला मिळाली तब्बल नऊ पारितोषिके ■

# आंतरमंडळीय नाट्यस्पर्धेत 'स्टेलमेट' प्रथम

■ *टीम महापारेषण, कराड*

महाराष्ट्र राज्य विद्युत महापारेषण कंपनीच्या आंतरमंडळीय नाट्यस्पर्धेच्या अंतिम फेरीत 'स्टेलमेट' हे नाटक विजेते ठरले. औरंगाबाद येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी या नाटकाची निवड झाली. या नाटकाला एकूण नऊ पारितोषिके मिळाली.

प्राथमिक फेरीसाठी लेखक श्री. मकरंद कुलकर्णी यांनी लिहिलेलं 'स्टेलमेट' हे नाटक कराड महापारेषणच्या टीमने सादर केले. हे नाटक अधीक्षक अभियंता श्रीमती छाया साळे यांनी दिग्दर्शित केले. नाटकात मुख्य कलाकार जगन्नाथ पवार, योगिनी कुलकर्णी, पद्माकर जोशी, सुनील बंडागळे, पाटकुळकर व सुनील इंगवले तर नेपत्य, रंगभूषा, वेशभूषा म्हणून सौ. कुलकर्णी, प्रियंका कामबीरे यांनी काम पाहिले. पार्श्वसंगीत जयवंत साबळे, प्रमोद टक्कलगी यांनी तर प्रकाशयोजना सचिन साळवी यांनी सादर केली.



**कराड :** महापारेषणच्या आंतरमंडळीय नाट्यस्पर्धेच्या अंतिम फेरीत 'स्टेलमेट' या नाटकाला नऊ पारितोषिके मिळाली. याप्रसंगी नाटकातील कलाकार.

■ विविध विभागात १३ पारितोषिके ■

# आंतरमंडळीय नाट्यस्पर्धेत 'अडगळ' नाटक प्रथम



■ *टीम महापारेषण, नांदेड*

औरंगाबाद परिमंडळांतर्गत अउदा संवसु मंडळ परळी (वै) यांच्या वतीने आंतरमंडळीय नाट्यस्पर्धेत 'अडगळ' या नाटकास प्रथम पारितोषिक मिळाले.

श्री. जितेंद्र जाधव लिखित व अधीक्षक अभियंता विजय कत्राळे निर्मित श्री. कार्यकारी अभियंता श्री. एस. आर. रामटेके दिग्दर्शित 'अडगळ' या नाटकाने विविध विभागात एकूण १३ पारितोषिके पटकाविली. औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. अविनाश कोंडावार व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील यांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली.



## *महापारेषणची उद्दिष्टे*

सामाजिक जबाबदारीचे भान ठेऊन काम करणे



■ नाशिक परिमंडळाकडे यजमानपद ■

# आंतरमंडळीय नाट्यस्पर्धेत 'उत्तरदायित्व' प्रथम

■ *टीम महापारेषण, नाशिक*

महापारेषणच्या नाशिक परिमंडळांतर्गत आंतरमंडळीय नाट्यस्पर्धा घेण्यात आल्या. सुरुवातीला नाट्यस्पर्धेचे उदघाटन संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण यांचे हस्ते झाले. मुख्य अभियंता (महावितरण) श्री. ब्रीजपालसिंग जानवीर यांच्या उपस्थितीत नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंती वीके यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी नाट्यस्पर्धेचे कार्याध्यक्ष अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव होते.

स्पर्धेत 'भिजलेल्या गोष्टी', 'अडाण', 'एक होता बांबूकाका', 'उत्तरदायित्व' ही नाटके सादर करण्यात आली. बक्षीस वितरण सोहळा सिनेतारका मधुरा देशपांडे यांच्या हस्ते झाला. अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नाशिक, अउदा प्रकल्प मंडळ, नाशिक, चाचणी तथा दूरसंचरण मंडळ, नाशिकतर्फे सादर झालेल्या 'उत्तरदायित्व' नाटकास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.




**नाशिक :** आंतरमंडळीय नाट्यस्पर्धेत महापारेषणच्या 'उत्तरदायित्व' नाटकाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. त्याप्रसंगी अधिकारी व कलावंत.

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# नांदेडच्या तांत्रिक परिसंवादाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ *टीम महापारेषण, नांदेड*

अउदा संवसु मंडळ, परळी (वै) अंतर्गत ४०० के.व्ही. ग्रहण केंद्र कुंभारगाव, नांदेड येथे ट्रान्सफॉर्मर कमिशनींग-इरेक्शन व डायग्नोस्टिक मॉनिटरिंग या विषयावर एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

हा परिसंवाद कार्यकारी अभियंता श्री. एस.आर. रामटेके यांचे अध्यक्षतेखाली एसएसई लिमिटेड, हैदराबाद येथील वरिष्ठ व्यवस्थापक (विपणन व सेवा) श्री. विशाल बोगा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. परिसंवादाला ४०० के.व्ही.ग्रहणकेंद्र विभाग, कुंभारगाव, नांदेड, अउदा संवसु विभाग नांदेड, प्रकल्प विभाग, नांदेड, चाचणी विभाग, नांदेड येथील सर्व अधिकारी व तांत्रिक कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.






**कुंभारगाव, नांदेड :** येथे आयोजिलेल्या एक दिवसीय परिसंवादात बोलताना श्री. विशाल बोगा. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित अधिकारी व कर्मचारी.

कलाविश्व

■ विद्यार्थ्यांनी दिला सामाजिक संदेश ■

# कुंभारगाव येथे चित्रकला स्पर्धा

■ *टीम महापारेषण, नांदेड*

औरंगाबाद परिमंडळांतर्गत ४०० के.व्ही. ग्रहण केंद्र विभाग, नांदेड येथे टाकाऊ वस्तुंवर चित्र काढण्याची स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये १९ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांनी उपकेंद्रातील टाकाऊ ऑईल बॅरलवर 'झाडे लावा, झाडे जगवा', 'बेटी पढाव, बेटी बचाव', 'पाणी हे जीवन' असे सामाजिक आशयांचे संदेश देणारी चित्रे रंगविली. रंगविलेल्या त्या बॅरेलमध्ये झाडे लावल्याने उपकेंद्राच्या सौंदर्यात भर पडली आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकारी अभियंता सर्वश्री एस.आर.रामटेके, अतिरिक्त कार्यकारी अभियंता ए. एन. वाघमारे, डी. बी. राजूरकर, एस. डी. तिडके, एस.एस.गारजकर, जे. एल. गोरे, आर.जे. तालोड, मो.अस्लम, एस. व्ही. सोनकांबळे, एम. टी. चिलके, के. बी. सोनखेडकर, जी. व्ही. राहाटे, एस. टी. सोळके, एफ. एस. सिद्दीकी, एस. आर. गवळे, यू. आर. गुंडू, एस. के. देखमुखे यांनी परिश्रम घेतले.



नांदेड : ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभागाच्या वतीने नांदेड येथे टाकाऊ वस्तुंवर चित्र काढण्याची स्पर्धा घेण्यात आली.

शिक्षण-प्रशिक्षण

# पडघे येथे चार दिवसांचे प्रशिक्षण शिबिर



■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषणच्या सांघिक कार्यालय प्रशिक्षण, संशोधन व विकास विभागाच्या वतीने Project, O &M Best Practices या विषयावर चार दिवसांचे प्रशिक्षण पडघे येथे घेण्यात आले. यामध्ये ९० अभियंत्यांनी सहभाग घेतला. यामध्ये प्रकल्प आणि योजना, दक्षता, सुरक्षा, सॅप प्रणाली, मानव संसाधनातील प्रश्न, देयके याबाबत चर्चा करण्यात आली.

तसेच महापारेषण कंपनीतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतरचे जीवन या धोरणातून वाशी परिमंडळ कार्यालयाने निवृत्तीनंतरचे नियोजन या विषयावर दोन दिवसांचे प्रशिक्षण घेतले. याप्रसंगी प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) डॉ. शीतल गेडाम उपस्थित होते.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे डिसेंबर २०१८ - जानेवारी २०१९

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. शिवशंकर बसय्या स्वामी | अधीक्षक अभियंता | अउदा, संवसु मंडळ, परळी | ३१.१२.२०१८ |
| २. | श्री. राजकुमार संभाजी कांबळे | अधीक्षक अभियंता | सांघिक कार्यालय | ३१.०१.२०१९ |

# 'महापारेषण'मध्ये ७० वा प्रजासत्ताक दिन उत्साहात



■ *टीम महापारेषण, मुंबई*

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ७० वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच 'महापारेषण'च्या सात परिमंडळ कार्यालयांमध्येही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले.

प्रकाशगंगा येथील मुख्यालयात 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांनी ध्वजारोहण केले. यावेळी 'महापारेषण'चे संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) गणपत मुंडे, संचालक (वित्त) विनायक साठे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुधीर वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) संजय कुमार, शिष्टाचार अधिकारी सतीश जाधव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



←

**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** 'महापारेषण'चे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया.



## *महापारेषणची उद्दिष्टे*

रुपांतरण वर्धन क्षमतेचे (Transformation Capacity) लक्ष्य गाठणे.



# चंद्रपूर येथे सुरक्षितता प्रशिक्षण शिबिर

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

नागपूर परिमंडळीय प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर येथे सुरक्षितता प्रशिक्षण, KYS प्रशिक्षण, MSBTE अध्यापक प्रशिक्षण, Project O& M Best Practices या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. यामध्ये ४० जणांनी आपला सहभाग नोंदविला.

याप्रसंगी एच.व्ही. डी.सी. परिमंडळ, चंद्रपूरचे अधीक्षक अभियंता सर्वश्री आत्राम, कार्यकारी अभियंता अविनाश वट्टी, सुनील सारडे, उमेश शेंडे यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण आपल्या दारी या उपक्रमात उपकेंद्राला जाऊन तेथील कर्मचाऱ्याला त्यांच्या उपकेंद्राची माहिती व घ्यावयाची काळजी याबद्दल प्रशिक्षण देण्यात आले.



**चंद्रपूर :** येथे सुरक्षितता प्रशिक्षण या शिबिरात माहिती घेताना प्रशिक्षणार्थी.

# तळंदगे येथे विविध प्रशिक्षण शिबिर




■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

कराड परिमंडळांतर्गत सारथी प्रशिक्षण केंद्र, तळंदगे येथे विविध प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. यामध्ये कर्मचारी वर्ग ३ व ४ यांच्यासाठी वर्तुणुक प्रशिक्षण व महिला कर्मचाऱ्यांसाठी महिला सबलीकरण शक्ती प्रशिक्षण घेण्यात आले.

कराड व अमरावती परिमंडळांतर्गत कार्यरत असलेल्या अभियंत्यांकरिता Best Project & (O &M) Practices हे चार दिवसांचे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी मुख्य अभियंता सर्वश्री विकास बढे, अधीक्षक अभियंता अविनाश कसबेकर, रघुनाथ चव्हाण, रघुनाथ चव्हाण, सहाय्यक महाव्यवस्थापक इमाम सिद्धीकी, समन्वयक नितीन डाके यांनी परिश्रम घेतले.



***महापारेषणची उद्दिष्टे***

पारेषण वाहिन्यांचे लक्ष्य गाठणे.



■ मराविमं अधिकारी संघटनेचे राजस्तरीय अधिवेशन ■

# पदांची कपात नाही, पगारवाढ देणार : ऊर्जामंत्री

■ *टीम महापारेषण, नागपूर*

वीज कंपन्यांमध्ये पुनर्रचना करताना पदे कमी करण्यात येणार नाहीत, गैरसमज असतील तर दूर केले जातील. मात्र, काळानुसार बदल हा अपेक्षितच आहे. त्यामध्ये काही सुधारणा असल्यास संघटनेने व्यवस्थापनास कळवावे. तिन्ही वीज कंपन्या आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या पाहिजेत. वीजहानी १५ टक्क्यांपेक्षा कमी आणणे गरजेचे आहे. वीज अधिकारी, कर्मचाऱ्यांची पगारवाढ विधानसभा निवडणुकीपूर्वी केली जाईल, अशी घोषणा ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

महाराष्ट्र राज्य वीज मंडळ अधिकारी संघटनेचया ४२ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे उदघाटन ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर प्रादेशिक संचालक, महावितरण (प्रभारी) नागपूर श्री. दिलीप घुगल, महापारेषणचे कार्यकारी संचालक (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता (नागपूर परिमंडळ) श्री. सुरेश पाटील, म.रा.वि.मं. अधिकारी संघटनेचे अध्यक्ष श्री. सतीश तळणीकर, सरचिटणीस श्री. दिलीप शिंदे, संघटन सचिव श्री. प्रवीण बागुल उपस्थित होते.




**नागपूर :** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेच्या ४२ व्या राज्यस्तरीय अधिवेशनप्रसंगी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे. शेजारी महापारेषणचे कार्यकारी संचालक (प्रभारी) सर्वश्री सुगत गमरे, दिलीप घुगल, सतीश तळणीकर, प्रवीण बागुल, दिलीप शिंदे.

महापारेषणचे कार्यकारी संचालक (प्रभारी) श्री. सुगत गमरे म्हणाले, ``आठ प्रगत राज्यांमध्ये महाराष्ट्र वीज कंपन्या अग्रक्रमावर असल्या तरी आगामी आव्हाने फार मोठी आहेत. त्याकरिता आपल्या क्षमतांमध्ये बदल व सुधारणा करणे ही काळाची गरज आहे.``

अधिवेशनाला महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनीतील वित्त व लेखा, महसूल, मानव संसाधन, औद्योगिक संबंध, माहिती तंत्रज्ञान, जनसंपर्क, सुरक्षा व अंमलबजावणी आणि विधी विभागाचे राज्यभरातील ४०० वीज अधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. विकास आडे यांनी तर आभार श्री. राजेश कुंभरे यांनी मानले.

■ राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी अधिवेशन ■

# कॉर्पोरेट बदलाचा स्वीकार करा : गमरे



**सोलापूर :** मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या व्दिवार्षिक अधिवेशनाचे उदघाटन करताना ज्येष्ठ विधिज्ञ इंदिरा जयसिंग. याप्रसंगी सर्वश्री संजय घोडके, दिनेशचंद्र साबू, संजय ताकसांडे, जे.एस.पाटील, प्रेमानंद मौर्य, एन. बी. जारोंडे, संजय शिंदे, राजू गायकवाड व अन्य.

■ *टीम महापारेषण, सोलापूर*

देशात १९९० पासून जागतिकीकरणाचे वारे सुरु झाले. सुरुवातीला यास विरोध करण्यात आला. मात्र, उत्पादन व सेवा क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कंपन्यांची मक्तेदारी यामुळे मोडित निघाली. विद्युत मंडळाचेही कंपनीत रूपांतर झाले. वीज ही एक शक्ती असून देशाची आर्थिक ताकद वाढविते. अशा क्षेत्रात आपल्याला काम करण्यास मिळते हे सौभाग्य आहे. काळाप्रमाणे कर्मचाऱ्यांनीही आपले काम हे खासगी कॉर्पोरेट कंपन्यांप्रमाणे करण्याचा प्रयत्न करावा. बदल स्वीकारण्याची तयारी करावी, असे मत महापारेषणचे कार्यकारी संचालक (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांनी व्यक्त केले.

राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या वतीने हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या राज्यव्यापी अधिवेशनाचा समारोपप्रसंगी श्री. सुगत गमरे बोलत होते. यावेळी `बहुजन समाजाच्या सामाजिक अभिसरणाची आवश्यकता` या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.

यावेळी श्री. गमरे यांनी आपले मत मांडले. अध्यक्षस्थानी संघटनेचे कार्याध्यक्ष श्री. प्रेमानंद मौर्य होते. यावेळी विभागीय भविष्य निर्वाह निधीचे सहायक आयुक्त श्री. हेमंत तिरपुडे, महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. राजू गायकवाड, प्रा. अंजनाताई गायकवाड, श्री. मिलिंद बनसोडे उपस्थित होते. प्रास्ताविक श्री. एस. के. हनवते, श्री. एन. बी. जारोंडे यांनी केले.



## *महापारेषणची उद्दिष्टे*

परस्परांच्या हितांची जपणूक, विश्वास, पारदर्शकता व मोकळ्या संवादाची संस्कृती व्यवस्थापनात रुजविणे



From the Desk of ED, HR

# वेळेचे व्यवस्थापन




कोणत्याही कंपनीत काम करताना कर्मचाऱ्यांनी वेळेबाबत स्वयंशिस्त पाळायवी हवी. कामाचे योग्य व्यवस्थापन केले तर काम करताना येणारा ताण हलका होऊ शकतो. त्यामुळे कार्यालयात काम करताना वेळेच्या सदुपयोगाबद्दल आपण सतर्क राहायला पाहिजे. वेळेच्या व्यवस्थापनामुळे कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करता येतो आणि त्यानुसार आपली कामे उरकता येतात. अत्यंत घाईगर्दीच्या वेळेस अचानक उद्भवलेली महत्त्वपूर्ण कामे वेळेत पूर्ण करता येतात आणि परिस्थितीवर ताबा मिळवणे शक्य होते. काम वेळेवर केल्यामुळे उत्पादनक्षमता वाढवता येते. त्यामुळे मनावरच्या ताणाची पातळी कमी करता येते. कार्यालयीन कामे आणि व्यक्तिगत आयुष्यात पार पाडायच्या गोष्टी यांचा समतोल साधता येणे शक्य होते. एक चिनी म्हण आहे. 'उद्या' उमलणारी सर्व फुलं 'आजच्या' बियांमधून जन्म घेतात. म्हणजे उद्याची आपली रंगीबेरंगी, स्वप्नं लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी आजचा प्रत्येक क्षण, फक्त आणि फक्त स्वप्नपूर्तीच्या दिशेने वापरला जाणं, आवश्यक आहे.

काम करताना ध्येय ठरवा, आपला प्रत्येक बहुमुल्य क्षण, आपली ध्येये प्रत्यक्षात आणण्यासाठीच खर्च करावा. ध्येयावर न पोहोचणे, ही शोकांतिका नाही. पोहोचण्यासाठी ध्येयच नसणे, ही खरी शोकांतिका आहे. तेव्हा आपल्यासमोर नेहमीच एखादं उद्दिष्ट अथवा ध्येय असावं. त्यामुळे आपल्या कामाला, आणि ध्येय साध्य करण्यासाठी, आपण जो वेळ देता, त्याला एक दिशा प्राप्त होते. कामाला प्राधान्य देऊन योजना तयार करण्यासाठी खर्च केलेला एक मिनिट ती योजना अमलात आणताना दहा मिनिटे वाचवते. काम उद्यावर ढकलणे, क्रेडिट कार्ड वापरण्यासारखे आहे. बिल मिळेपर्यंत फार मजा वाटते. जेव्हा ध्येय गाठण्याचा प्रयत्न तुम्ही करत असता, त्यावेळी इटालियन अर्थतज्ज्ञ परेटो यांचा '८०-२०' हा नियम वापरा. परेटो यांनी असं म्हटलंय की, ८० टक्के पुरस्कार तुम्हाला २० टक्के प्रयत्नांतून मिळू शकतात. हे अतिशय मौल्यवान २० टक्के प्रयत्न कोणते, ते समजून घेतल्यानंतर तुमचे अग्रक्रम तुम्ही ठरवू शकता. अशा तऱ्हेने तुम्हाला प्रगतीच्या पायरीवर पुढे जाण्यास मदत करतील. अशा गोष्टींना आधी वेळ देणं, हे महत्त्वपूर्ण ठरतं.

काम करताना यादी बनवायला लागा. सुरुवात कशी झाली यावर बऱ्याच घटनांचा शेवट अवलंबून असतो. दिवसभरात कोणकोणती कामं करायची, याची आखणी मनाशी करायला हवी. त्यामुळे कॅलेंडर किंवा कामाच्या वेळापत्रकाशी जुळवून घेता येतं किंवा कामांची यादी करून आवश्यकतेनुसार त्यात बदलही करता येईल. या दोन्ही पद्धतींचा उपयोग गरज भासेल त्याप्रमाणेही करता येणं शक्य आहे. त्यामुळे कामाचं प्राधान्य लक्षात घेऊन, एकापाठोपाठ एक काम, फटाफट, उरकणं शक्य होतं.

शारीरिक व मानसिक दृष्टीनं प्राइम टाइम लक्षात घेऊन एकावेळी एकच काम आणि तेही एकाग्रतेने करा. तुम्ही दिवसातल्या ज्या वेळात कामाच्या दृष्टीनं उत्साही, क्रियाशील असता, त्या वेळेत काम पूर्ण करणं उत्तम. हे जाणून घेऊन त्यावेळी काम केलं तर ते अधिक दर्जेदार आणि लवकर पूर्ण होतं. तुमच्यासाठी महत्त्वाची आणि प्रथम करायला हवीत अशी कामं करण्यासाठी वेळ देणं हा वेळेचं नियोजन करण्याचा सगळ्यात परिणामकारक मार्ग आहे. कामात आनंद निर्माण केला की त्याचं ओझं वाटत नाही.

अशा वेळी त्या कामाचे छोटे-छोटे भाग करावेत आणि एक एक भाग पूर्ण करावा. कामाचा सगळा भार एकदम पेलण्यापेक्षा एका वेळी थोडं-थोडं काम पूर्ण केलंत, तर तुम्ही अशा टप्प्यावर पोहोचाल, जिथे तुम्हालाच ते काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवड निर्माण होईल.

हे काम करताना अनावश्यक गोष्टींकडे, दुर्लक्ष करण्याची कला शिकून घेतली पाहिजे. जे झालं त्याचा विचार करू नका; जे होणार आहे त्याचा विचार करा. अशी कामं जी आपल्या ध्येयापासून दूर-दूरपर्यंत संबंधित नाहीत, अनावश्यक आहेत, त्यांच्यावर कळत-नकळत वेळ जातोय, त्याबद्दल सतर्क व्हा. त्यांच्यावर घालवत असलेला वेळ कमी-कमी करत आणा. क्षुल्लक गोष्टीं आणि ज्या कामांचा तुम्हाला भावी आयुष्यावर फारसा परिणाम होणार नाही, अशा गोष्टींपासून दूर राहायला शिका. कामांच्या यादीत महत्त्वाची कामं कोणती आणि बाजूला सारता येण्यासारखी कोणती, हे तुम्ही नक्कीच ठरवू शकता. ज्यादिवशी आपली थोडीही प्रगती झाली नाही, तो दिवस फुकट गेला, असं समजा.

स्वतःलाही वेळ दिला पाहिजे. रोज काही वेळ स्वतःसाठी आवर्जुन राखुन ठेवा. ध्यान, व्यायाम, स्वयंसुचना, वाचन, छंद आपल्याला आयुष्यावर प्रेम करायला शिकवतात. त्यांना थोडा वेळ द्या, ते तुम्हाला आनंद देतील. उदा. निसर्गावर, झाडावर प्रेम करणारा माणूस सदैव प्रसन्नच असतो, तर चांगली कविता माणसाला संवेदनाक्षम बनवते. जगण्यात मौज आहेच पण त्याहून अधिक मौज फुलण्यात आहे. आयुष्यात असं काहीतरी मिळवा, जे तुमच्यापासून कुणीही चोरून घेऊ शकत नाही. हसा, खेळा पण शिस्त पाळा. 'सुट्टी' ही नवं काहीतरी शिकण्याची संधी असते व आयुष्य ही खरी दौलत.

**- सुगत गमरे**
कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.